ePaper


## बाळासाहेबांनी तयार केलेली घटना पक्षाने पाळली नाही:राहुल शेवाळे



| वर्ष - 7 | अंक - 215 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 13 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


**आतील पानांत**

- सूर्यकुमार-रिंकूचे अर्धशतक व्यर्थ!
- रश्मिका पोहोचली काश्मीरला
- जो बायडेन भारतात येणार नाहीत!
- मंत्रिपदाचा कागद फाडून टाकेन


# प्राण्यांच्या मृत्युची होणार चौकशी!

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याचे आदेश : विधानसभा सभागृहात चर्चा

| नागपूर | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयातील 36 प्राण्यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत जाहीर केला. हे प्राणी संग्रहालय वन विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिकेला दिले आहेत.**



### 36 प्राण्यांचा मृत्यू ही गंभीर बाब

»दरम्यान, २०१७ ते सन २०२३ या कालावधीत एकूण ३६ प्राणी मृत्युमुखी पडले आहेत. सदर प्राण्यांचा मृत्यू नैसर्गिक असून औंध येथील शासकीय रूग्णालयामार्फत शवविच्छेदन करून प्राधिकरणाला महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे. ३६ प्राण्यांचा मृत्यू ही गंभीर बाब असून त्याची प्रधान सचिव नगरविकास यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. राज्याच्या वन विकास महामंडळाकडे महापालिकेने हे प्राणी संग्रहालय हस्तांतरीत करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

यासंदर्भात सदस्या श्रीमती अश्विनी जगताप यांनी प्रश्नोत्तराच्या तासात मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.या प्राणी संग्रहालयाच्या नुतनीकरण व सुशोभिकरणासाठी केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने आराखडा मंजूर केला आहे. त्यानुसार काम करण्यासाठी २०१७ पासून प्राणी संग्रहालय बंद आहे. केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे काही कामे करावयाची असल्याने प्राणी संग्रहालय खुले करण्यात आलेले नाही.


यावेळी झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सदस्य नाना पटोले, योगेश सागर यांनी भाग घेतला.

# नागपुर, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे या सर्व महापालिकांचेही ऑडिट करा

## » शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांची मागणी

| मुंबई | महाईन्यूज |

मुंबई महापालिकेचे ऑडिट होणार असेल तर नागपुर, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे या सर्व महापालिकांचेही ऑडिट करा, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. ते नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.



संजय राऊत म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका काही राष्ट्रीय स्वरूपाची नसते. दोन दिवसांपूर्वी पंडित नेहरूंवर अमित शहा यांनी टीका केली, या देशात लोकशाही, संविधान आहे. सेन्सरशिप लावली नाही. राजकीय भूमिका घेऊन कोणी टीका करत असेत आणि त्यावर एखाद्या पक्षाचे लोक गुन्हे दाखल करून अटकाव करण्याचा प्रयत्न करत असेल तर या लोकांना आम्ही आणीबाणीविरूद्ध लढा दिला, असा डंका पिटण्याचा अधिकार नाही.

दिशा सालीयानप्रकरणी एसआयटी स्थापन करायची असेल, तपास सीआयडीकडे द्यायचा असेल तर द्या, आमची काही हरकत नाही. राजकीय विरोधकांच्या संदर्भात खोटे भ्रम निर्माण करायचे, बदनामी करायची आणि आपली राजकीय पोळी भाजायची हा सत्तापक्षाचा धंदा झाला आहे. हा बदनामी करण्याचा कारखाना आहे, पण आम्ही त्यांना भीक घालत नाही, त्यांना एसआयटी चौकशी करायची असेल तर खुशाल करा, असं संजय राऊत म्हणाले.

मुंबई महापालिकेचे ऑडिट होणार असेल तर नक्कीच करा, सोबतच नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, ठाणे या सर्व महापालिकांचेही ऑडिट करा. शिवाय नगर विकास विभागाच्या गेल्या दीड वर्षांतील कारभाराचे आणि व्यवहाराचेही ऑडिट करा, असं संजय राऊत म्हणाले.

मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांवर दबाव येत होता. आधी सदस्यांनी राजीनामे दिले, आता मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षांवर दबाव येत होता. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला, असेही राऊत म्हणाले. युवा संघर्ष यात्रेच्या समारोपाला आमच्या पक्षाकडून कोणीतरी उपस्थित राहतील. शरद पवार यांचा वाढदिवस आहे, त्यांना उद्धव ठाकरे आणि आम्ही सर्व नेते शुभेच्छा देणार आहोत, असंही संजय राऊत म्हणाले.

# भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन मोशीमध्ये..!

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन "किसान" १३ ते १७ डिसेंबर २०२३ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, भोसरीजवळ, पुणे येथे आयोजित होत आहे. १५ एकर प्रदर्शन क्षेत्रावर ४५० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था, नव उद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनात, ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ विभागातील स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत केले आहे. मोबाईलचा वाढता वापर आणि डिजीटल इंडिया उपक्रमांमुळे शेतकऱ्यांशी संवाद साधणे सहज शक्य झाले आहे. यामुळेच उद्योजक नवनवीन सेवा व उत्पादने शेतकऱ्यांसमोर मांडण्यास उत्सुक आहेत. हे उद्योजक प्रामुख्याने बाजारभाव, जल व्यवस्थापन, शेतमालाचे मूल्यवर्धन, जैवतंत्र या क्षेत्रात नवीन संकल्पना घेऊन येत आहेत.

# वाड्यांना 'एसआरए' भासवून केली जाणारी बांधकामे थांबवा

## एसआरए पुनर्विकास करण्याचा प्रकार आला समोर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पेठांमध्ये जुन्या वाड्यांना झोपडपट्टी असल्याने दाखवून त्यांचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एसआरए) पुनर्विकास करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी अशा प्रकारे परवानगी घेतलेल्या सर्व बांधकामांना स्थगिती द्यावी असे पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्याधिकाऱ्यांनी लिहिले आहे.**

तसेच महापालिका स्तरावर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तीन अधिकाऱ्यांची समिती गठित केली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात जुने वाडे, जुन्या इमारती आहेत. त्यांच्या पुनर्विकासासाठी शासनाकडून राज्याच्या एकात्मिक बांधकाम विकास नियमावलीत तयार करण्यात आली आहे. नियमांची पूर्तता करणे शक्य नसल्याने अनेक वाड्यांचा पुनर्विकास रखडलेला आहे. दरम्यान, 'एसआरए'ने शासनाला पत्र लिहून शहरातील एखाद्या भागात झोपडपट्टीसदृश भाग असल्यास आणि महापालिकेच्या संबंधित विभागाने त्याबाबत अभिप्राय दिल्यास अशा ठिकाणी 'एसआरए' राबविता येईल. त्यास मान्यता द्यावी अशी मागणी




केली होती. त्यानुसार शहराच्या मध्यवर्ती भागातील जुने वाडे झोपडपट्टी भासवून तेथे एसआरए योजना राबविण्याचा उद्योग काही बांधकाम व्यावसायिक, राजकीय एजंट आणि क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, उपअभियंत्यांनी सुरु केला. या वाड्याला एसआरएचा दर्जा मिळाल्याने महापालिकेचे बांधकाम विकसन शुल्कही बुडाला आहे. शिवाय बिल्डरांनी तेथे टीडीआर खर्ची पाडून स्वतःचा फायदा करून घेतला आहे. यामध्ये एका प्रकरणामागे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना ३० रुपये मिळाले असून, सुमारे ७० परवानग्या अशा प्रकारे दिल्या असल्याचा आरोप माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर यांनी केला होता. तशी तक्रार आयुक्तांकडेही केली होती.

त्यानुसार आयुक्तांनी एसआरएच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र लिहिले असून, त्यामध्ये जुन्या वाड्यांना एसआरए अंतर्गत देण्यात आलेल्या परवानग्या स्थगित करून तेथील बांधकाम बंद करावे. तसेच त्याचा अहवाल महापालिकेला सादर करावा, असे त्यात नमूद केले आहे.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता युवराज देशमुख, मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त महेश पाटील आणि दक्षता विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गिरोला यांची समिती गठित केली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर संबंधित अधिकारी, उपअभियंत्यांवर कारवाई केली जाणार आहे, असे विक्रम कुमार यांनी सांगितले.

### बाणेर प्रकरणाचा अहवाल प्रलंबित

पेठांमध्ये जुन्या वाड्यांना झोपडपट्टी असल्याने दाखवून त्यांचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (एसआरए) पुनर्विकास करण्याचा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी अशा प्रकारे परवानगी घेतलेल्या सर्व बांधकामांना स्थगिती द्यावी असे पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्याधिकाऱ्यांनी लिहिले आहे. बाणेर येथे बांधकाम सुरु असताना पादचारी मार्गावरून आईसोबत चालत जाणाऱ्या नऊ वर्षाच्या मुलाच्या डोक्यात लोखंडी गट्टू पडून त्याचा मृत्यू झाला. या बांधकामाबाबत अनेक तक्रारी आल्याने आयुक्तांनी अधिक्षक अभियंता युवराज देशमुख यांना तीन दिवसात यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. पण परंतु आठवडा उलटून गेला तरीही हा अहवाल सादर झालेला नाही.

# भोसरीत 'खेळ रंगला पैठणीचा' महिलांची धम्माल!

## आ. महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम; सामाजिक कार्यकर्त्या कविता भोंगाळे यांचा पुढाकार





। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**घर...कुटुंब...आणि रोजच्या धावपळीतून महिलांना मनमुराद आनंद घेता आला पाहिजे. महिलांच्या कर्तुत्वावाला संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या कविता भोंगाळे यांनी केले.**

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त भोसरी येथे गायत्री सखी मंच व कविताताई भोंगाळे युवा मंचच्या पुढाकाराने सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर व सह्याद्री मळेगावकर प्रस्तुत होम मिनिस्टर "खेळ रंगला पैठणीचा" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भोंगाळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

भोसरीतील डॉ. बाबासाहेब उद्यान समोर विदर्भ मित्र मंडळजवळ हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला महिलांनी उत्कृष्ट प्रतिसाद मिळला. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, शिवांजली सखी मंच अध्यक्षा पूजा लांडगे, प्रिया लांडगे, सातारा शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव, प्रसिद्ध उद्योजक विनायक भोंगाळे, माजी नगरसेवक सागर गवळी, विकास डोळस, वसंत लोंढे, भीमा फुगे, दत्ता गव्हाणे, कविता गव्हाणे, कुलदीप परांडे, हरिभाऊ तांदळे, रवींद्र नांदुरकर, स्वाती शिर्के, मनीषा गंगणे, संदीप पंडित व श्री शंकर महाराज यांचे शिष्य जगदीश महाराज उपस्थित होते.

कविता भोंगाळे म्हणाल्या की, महिलांच्या कर्तुत्वाला वाव देण्यासाठी आमदार महेश लांडगे व शिवांजली सखी मंच अध्यक्षा पूजा लांडगे 'इंद्रायणी थडी' जत्रेच्या माध्यमातून व अन्य सामाजिक उपक्रमातून कार्यरत असतात त्यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनातून गृहिणींच्या मनोरंजना करिता हा कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब कोकाटे यांनी केले.

### गरजवंत विद्यार्थ्यांना साहित्य वाटप...

**भोसरी परिसरातील गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच, किल्ले स्पर्धा विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच, सिने अभिनेते क्रांती नाना मळेगावकर यांनी महिलांच्या मनोरंजनाकरिता विविध खेळ घेऊन विजेत्या महिलांना एल.ई.डी. टीव्ही, ओव्हन, टेबल फॅन, मिक्सर, गॅस शेगडी व 11 मानाच्या पैठण्या तसेच खेळात सहभागी प्रत्येक महिलेस आकर्षक भेटवस्तू देण्यात आले.**

# त्रिवेणीनगर-तळवडे प्रवास "जीवघेणा"!

## अपघात प्रमाण वाढले : चार दिवसात दोघांनी प्राण गमावले

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**त्रिवेणीनगर - तळवडे रस्त्यावर आज सायंकाळच्या सुमारास भीषण अपघातात एका ४० वर्षीय व्यक्ती डंपरखाली येऊन चिरडला गेला. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनं रस्त्यावर एकच गर्दी झाली होती. यात दुचाकीवरील १२ वर्षीय मुलगा थोडक्यात बचावला आहे.**



नवनाथ भानूदास गायकवाड (वय ४०) असं मृत्यू झालेल्या दुचाकी चालकाचं नाव आहे. दीपक नवनाथ गायकवाड (१२, रा. सोनवणे वस्ती, ताथवडे) असे अपघातात बचावलेल्या मुलाचे नाव आहे. या अपघाताने या परिसरात काहीवेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मुलगा रस्त्याच्या बाजूला पडल्याने तो थोडक्यात बचावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, त्रिवेणीनगर रस्त्यावरून नवनाथ गायकवाड हे आपल्या १२ वर्षाच्या मुलासोबत त्यांच्या दुचाकीवरून जात होते. तेव्हा मागून येत असलेल्या डंपरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यामुळे गाडी चालवत असलेले नवनाथ हे दुचाकीवरून खाली पडले. त्यांना त्या डंपरने जवळपास शंभरहून अधिक मीटर फरफट नेले. त्यांच्या डोक्यावरून डंपरचे चाक गेल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. सुदैवाने मागे बसलेला त्यांचा मुलगा या अपघातात थोडक्यात बचावला आहे. अपघातामुळे रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता.

### नागरिकांचा जीव धोक्यात...

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अग्निशामक दलाला पाचारण करत रस्त्यावर पडलेले रक्त साफ केलं. रस्त्यावर झालेली वाहतूक कोंडी थोड्याच वेळात पोलिसांनी सुरळीत केली. या रस्त्यावर दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत आहे. काही दिवसांपूर्वी अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला होता. त्यावेळी नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. मात्र, आज पुन्हा अपघात झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

### नागरिकांचा रस्ता रोकोचा इशारा...

तळवडे चौकात शनिवारी (दि.९) दुपारी दोन वाजता वृषाली बाजीराव भालेकर यांचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना वाहतूक विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे घडली आहे. त्यामुळे तळवडे ग्रामस्थांनी प्रशासनाचा निषेध नोंदविला आहे. पोलीस आयुक्तांनी तळवडेतील वाहतूक समस्या १५ दिवसांत न सोडविल्यास तळवडे ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे. तळवडे ग्रामस्थांच्या वतीने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, भालेकर यांचा अपघात घडला त्या दिवशी आळंदी यात्रा होती. त्यावेळी तळवडे चौकात एकही वाहतूक नियंत्रक पोलीस उपस्थित नव्हता, या घटनेनंतर देहूरोड पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल गजेवार आले. त्यांनी संबंधित मयताचे नातेवाईक व ग्रामस्थ महिलांना धमकावले. तसेच तुमच्यावर गुन्हे दाखल करू व करिअर बर्बाद करू आणि उपस्थित महिलांसोबत असभ्य भाषेत वर्तन केले. या घटनेच्या निषेधार्थ संबंधित पोलीस कॉन्स्टेबल गजेवार यांची त्वरित बदली करावी. तसेच वाहतूक विभागाचे कर्मचारी व अधिकारी कोणीही हजर नव्हते त्यांच्यावर कारवाई करावी.

# खिलाडू वृत्तीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची वृद्धी!

## सहायक शिक्षण उपसंचालक ज्योती परिहार यांचे मत

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शालेय शिक्षणात जेमतेम प्रगती असलेला सर्वसामान्य कुटुंबातील सचिन तेंडूलकर भारताचा महान क्रिकेटपटू बनू शकतो. क्रीडा क्षेत्रातील अतुल्य कामगिरीसाठी त्याला भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात येते. सगळेच आयुष्यात यशस्वी होतात असे नाही. पण, एखादा खेळ जोपासला तर खिलाडू वृत्ती तयार होते आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासामध्ये वृद्धी होते. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा मिळते. ही बाब शिक्षक आणि पालकांनी लक्षात घेतली पाहिजे, असे मत सहाय्यक शिक्षण उपसंचालक ज्योती परिहार यांनी व्यक्त केले. .**

### गायत्री इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा दिवस उत्साहात






स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या (एसव्हीएसपीएम) भोसरी येथील ग्रायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा दिवस साजरा करण्यात आला. क्रीडा स्पर्धांची सुरूवात परिहार यांच्या हस्ते क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आली.

यावेळी १९ वर्षाखालील प्रो कबड्डी लीगमध्ये सुवर्णपदक पटकावणारा खेळाडू सुनील लांडगे, व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे यांच्यासह क्रीडा विभागाचे शिक्षण, कर्मचारी उपस्थित होते.

शाहुनगर येथील राजर्षि श्री शाहू महाराज क्रिडांगण येथे गायत्री स्कूलच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धकांचे वर्गवार गट करण्यात आले असून, विजेत्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र आणि मेडल देण्यात येणार आहे.

"स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्वच शाखांमध्ये प्रतिवर्षी वार्षिक क्रीडा दिवस आयोजित केला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी प्रेरणा मिळावी. या हेतूने होणाऱ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थीही उत्स्फूर्तपणे सहभागी होत असतात. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळावी. या करिता शाळा व्यवस्थापन प्रयत्नशील असते.

**- कविता भोंगाळे,,**
**व्यवस्थापकीय संचालक, एसव्हीएसपीएम.**




**तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांची खासदारकी रद्द करण्याचा प्रस्ताव लोकसभेत मांडला जात असताना, 'इंडिया'चे सदस्य प्रचंड आक्रमक झाले होते. कधी नव्हे इतके तृणमूल काँग्रेसचे खासदार महुआ मोईत्रा यांच्या पाठिशी उभे राहिलेले दिसले. मोईत्रा यांच्याविरोधात आरोप झाल्यानंतर खरंतर पहिल्यांदाच त्यांचा पक्ष त्यांची पाठराखण करत असल्याचे पहायला मिळालं.**

# चांदनी चौकातून : पाठिंबा नजरेत खुपला!




कल्याण बॅनर्जी, सुदीप बंदोपाध्याय यांचा सभागृहातील संघर्ष उपयोगी पडला नाही. अखेरचा निकराचा प्रयत्न म्हणून महुआ मोईत्राही तावातावाने बोलत राहिल्या. लोकसभेचं नवं सभागृह प्रचंड मोठं असल्याने आणि तिथं ॲकॉस्टिकचा दर्जा निकृष्ट असल्याने सदस्यांचा आवाज घुमतो. त्यामुळं त्यांचं बोलणं नीट ऐकू येत नाही! मोईत्रांनी केलेली घसाफोड कोणालाही ऐकू गेली नाही. प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर होणारच होता, त्यामुळं 'इंडिया'च्या सदस्यांनी आधीच सभात्याग केला. या सगळ्या घडामोडीत लक्ष वेधलं गेलं ते मोईत्रा आणि राहुल गांधी यांच्यामधील संवादाकडे. सभागृहाच्या दाराशी या दोघांमध्ये नेमकं काय बोलणं झालं कोणालाही माहिती नाही पण, मोईत्रा यांनी विशेषत्वाने राहुल गांधींकडे जात आपलं म्हणणं मांडल्याचं दिसत होतं. त्या दरम्यान मोईत्रांसाठी भांडणारे तृणमूल काँग्रेसचे खासदार मागंच राहिले होते. मग, सर्व विरोधक सभागृहाबाहेर पडले! नव्या संसदेच्या मकर द्वार नावाच्या प्रमुख दरवाजाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी उभे राहून निषेध नोंदवला. तिथे सोनिया गांधी आणि राहुल गांधी मोईत्रा यांच्यासोबत होते. तिथून 'इंडिया'चा जथा महात्मा गांधींच्या पुतळ्याकडे गेला. संसदेचं अधिवेशन नव्या इमारतीमध्ये गेल्यापासून हा 'इंडिया'चा संसदेच्या आवारातील पहिलाच छोटेखानी मोर्चा होता असं म्हणता येईल. गांधी पुतळ्यापाशी विरोधकांनी मोईत्रांना अपात्र ठरवल्याचा निषेध नोंदवला. त्यानंतर पांगापांग झाली, मोईत्रा आधी निघून गेल्या. तृणमूल काँग्रेसचे काही खासदार मागे रेंगाळले होते.

त्यांना कदाचित मोईत्रा यांचं निघून जाणं वा सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्याशी हितगुज केलेलं आवडलं नसावं. मोईत्रा तृणमूल काँग्रेसची खासदार आहे/होती. तिला महत्त्व तृणमूलमुळेच आहे. तिला जिंकायचं असेल तर तृणमूल काँग्रेसच लागेल, अशी खरमरीत टिप्पणी एका खासदाराने केली. त्या विधानामागील अर्थ असा की, काँग्रेसकडून मोईत्रांनी लोकसभेची निवडणूक लढवली तर त्यांचा पराभव अटळ असेल. पण मोईत्रांवर भाजपने आरोपांची राळ उठवली तेव्हा 'तृणमूल'ने लांब राहणं पसंत केलं होते. त्यानंतर मोईत्रांचा काँग्रेसकडे ओढा वाढू लागल्याच्या चर्चा केल्या जात होत्या. पण, नंतर तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी प्रतीकात्मक म्हणून का होईना मोईत्रांना कृष्णानगर पक्ष जिल्हाप्रमुख केले. त्यामुळं पक्ष मोईत्रांच्या पाठीशी उभा असल्याचं स्पष्ट झालं. पण, शुक्रवारी सोनिया आणि राहुल गांधींकडून मोईत्रांना मिळालेला पाठिंबा कदाचित काहींच्या नजरेत खुपला असावा असं दिसतंय. महुआ मोईत्रांची बडतर्फी होऊन संसदेच्या आवारातील लगबग संपल्यानंतर गंभीर चर्चेला तोंड फुटलं. गांधी पुतळ्यासमोर 'इंडिया'तील खासदारांची निदर्शनं झाल्यानंतर रेंगाळलेल्या खासदारांनी मोईत्रा प्रकरणाच्या परिणामांच्या शक्या-शक्यतेवर बोट ठेवलं. म्हणणं होतं की, मोईत्रांची खासदारकी रद्द करून भाजपने खासदारांवर अप्रत्यक्ष जरब बसवली आहे. आता खासदार प्रश्न विचारताना देखील दोन वेळा विचार करतील! संसदेच्या अधिवेशनामध्ये प्रश्नोत्तर आणि शून्य प्रहर ही दोन प्रमुख आयुधं आहेत. याच दोन तासांमध्ये खासदारांना राष्ट्रीय स्तरावरील भूमिका मांडण्याची, केंद्र सरकारला प्रश्न विचारून कोंडीत पकडण्याची संधी मिळते. मोईत्रा प्रकरणामुळे खासदारांनी राष्ट्रीय मुद्द्यांवर विचारलेल्या प्रश्नांकडे केंद्र सरकार आणि भाजप दोन्हीही साशंक नजरेने पाहतील. सरकार अशा खासदारांवर नजर ठेवू शकतं.. केरळमधील या खासदारांचं म्हणणं होतं की, अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रातील पहिल्या दोन तासांकडं सगळ्यांचं लक्ष असे. शून्य प्रहरामध्ये मुख्यत्वे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे प्रश्न विचारले जात असत. त्यानंतर दिवसभरात कधीही नियम ३७७ अंतर्गत आपापल्या मतदारसंघांमधील मुद्दे उपस्थित करण्याची खासदारांना संधी मिळत असे.

## संपादकीय »

# पेटवा की विझवा?

***दुबईत पर्यावरण रक्षणासाठीच्या परिषदेत पर्यायी इंधनांचा उदोउदो होत असताना सर्वात लोकप्रिय अशा पर्यायी इंधन निर्मितीवरचा हा बंदी निर्णय चर्चा-योग्य ठरतो.***

अन्न की इंधन हा प्रश्न अमेरिकेत गेल्या दशकात वारंवार विचारला गेला. त्याचे कारण होते इथेनॉल या द्रवाचा इंधन म्हणून अधिकाधिक वापर केला जाणे. कोणत्याही नैसर्गिक पिष्टमय पदार्थापासून- म्हणजे ज्यात शर्करा आहेत अशा- इथेनॉल तयार करता येते. बटाटा, रताळे, मका आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊस यांपासून इथेनॉल निर्मिती शक्य असते आणि हे इंधन प्रचलित इंधनास पर्याय ठरू शकते. हे स्पष्ट झाल्यापासून अनेक खासगी अन्नोत्पादकांनी अमेरिकेत अधिकाधिक इथेनॉल निर्मिती सुरू केली आणि फोर्डसारख्या कंपन्यांनी तर संपूर्णपणे इथेनॉलवर चालणाऱ्या मोटारी बाजारात आणल्या. ब्राझील हा जगातील सर्वात मोठा साखर उत्पादक देश. त्या देशाने तर कंत्राटी पद्धतीने आपल्या देशातील ऊस लागवडीखालील क्षेत्र इथेनॉल उत्पादकांसाठी प्राधान्याने दिले.

**राज्याचा समन्यायी विकास करणे हे कोणत्याही सरकारचे कर्तव्य असते. सरकारी निधीवाटपात सर्वांना समान न्याय मिळेल, अशा पद्धतीने नियोजन करणे अपेक्षित असते. पण राज्यात गेल्या काही वर्षांपासून विकास करताना सत्ताधारी आणि विरोधी लोकप्रतिनिधींचा मतदारसंघ असा भेदभाव केला जातो.**

# मग कसला 'समन्यायी' विकास?



जे उदाहरण म्हणजे राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या सुमारे ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांमध्ये सत्ताधारी आमदारांसाठी करण्यात आलेली विशेष तरतूद. सत्ताधारी भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीतील अजित पवार गटाच्या आमदारांच्या मतदारसंघातील विकासकामांसाठी खास बाब म्हणून मतदारसंघनिहाय सरासरी ४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. काही आमदारांच्या मतदारसंघांत यापेक्षा अधिक निधी मिळेल, याच वेळी विरोधी पक्षीय म्हणजे काँग्रेस, शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, समाजवादी पार्टी आदी विरोधी आमदार निधीपासून वंचित राहिले आहेत. महाराष्ट्रदिनी किंवा अन्य कार्यक्रमांमध्ये भाषणे ठोकताना मुख्यमंत्री वा उपमुख्यमंत्री राज्याचा समन्यायी विकास करण्याची गर्जना करतात. पण प्रत्यक्ष सरकारी निधीवाटप करताना विरोधी आमदारांच्या मतदारसंघांत निधीच द्यायचा नाही याचे समर्थन कसे करणार? विरोधी आमदारांच्या मतदारसंघातील जनता राज्याचे नागरिक नाहीत का? केवळ राजकीय उद्देश समोर ठेवून ठरावीक मतदारसंघांमध्ये निधीचे वाटप करण्याचे समर्थनच होऊ शकत नाही. शिवसेना, राष्ट्रवादीतील तोडाफोडीनंतर सत्तधारी महायुतीच्या आमदारांचे संख्याबळ २०० पेक्षा अधिक होते. म्हणजेच उर्वरित ८० आमदारांच्या मतदारसंघांत विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार नाही. या मतदारसंघातील नागरिकांनी काय घोडे मारले? पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांमधून २५ कोटी तर आता ४० कोटी म्हणजे गेल्या सहा महिन्यांत सत्ताधारी आमदारांच्या वाट्याला किमान ६५ कोटी रुपये आले आहेत. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी या निधीचा आमदार मंडळींकडून राजकीय लाभ उठविला जाईल हे निश्चितच. फक्त सत्ताधारी आमदारांच्या मतदारसंघांत अधिक निधी उपलब्ध करून देण्याच्या शिंदे सरकारच्या निर्णयाविरोधात ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांनी केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती. यातून सत्ताधाऱ्यांना अधिक हुरूप आला असणार. कारण 'यात सरकारची मनमानी किंवा भेदभाव दिसत नाही,' असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदविले होते! राज्य सरकारमध्ये जे झाले त्याचेच पडसाद मुंबई महानगरपालिकेत उमटणे स्वाभाविकच होते. मुंबई महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींची मुदत संपल्याने सध्या प्रशासकीय राजवट असली तरी सत्ताधाऱ्यांच्या दबावामुळे पूर्वी भाजपचे नगरसेवक असलेल्या प्रभागांमध्ये पालिका प्रशासनाने विशेष निधी मंजूर केला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हातभट्टीची दारु पिऊ नका!

## भाजपा नेत्या पंकजा मुंडेंचा कार्यकर्त्यांना सल्ला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दारु प्यायची असेल तर हातभट्टीची पिऊ नका असा सल्ला भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे. गोपीनाथ मुंडे यांची आज जयंती आहे. त्यानिमित्ताने बीडमध्ये विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच गोपीनाथ गडावर रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी पंकजा मुंडे यांनी हे वक्तव्य केलं.**

रक्तदान करताना त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि त्यांना हा सल्ला दिला आहे. दारु प्यायची असेल तर हातभट्टी पिऊ नका. त्याने विषबाधा होते. मी पिण्याला नाही म्हणत नाही. तंबाखू आणि पुड्या खाणं बंद करा आणि खाऊन कुठेही थुंकू नका. त्याने कॅन्सर होतो. तंबाखू पुड्या खाऊन तुम्ही मंदिराजवळ थुंकता, कसं दिसतं ते? यापुढे तंबाखू-पुड्या खाऊ नका.

तसेच चांगलं चांगलं खा. मास-मच्छी, व्हेजिटेरियन खा आणि निरोगी राहा." असा सल्लाही पंकजा मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला. गोपीनाथ गडावर मुंडे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर होतं. रक्तदान करताना पंकजा मुंडे यांनी हे वक्तव्य केलं आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर या दिवशी दरवर्षी कार्यकर्ते मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर जमतात. या सर्वांनी यावेळी आपआपल्या गावात आपल्या आवडीप्रमाणे जयंती साजरी करावी. तसंच गोपीनाथ मुंडे यांचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवावं असं आवाहनही पंकजा मुंडे यांनी आज केलं. गोपीनाथ मुंडे साहेबांचे स्वप्न जनतेसाठी होतं, त्यासाठीच त्यांनी मला तुम्हा सगळ्यांच्या ओटीत टाकले आहे.



गोपीनाथ मुंडे १०० वर्षे जगावेत असं तुम्हाला आणि आपल्याला सगळ्यांनाच वाटत होतं. मात्र गोपीनाथ मुंडे जगू शकले नाहीत. मी प्रभू वैद्यनाथाला अभिषेक केला, बुद्ध विहारात जाऊन प्रार्थना केली. हजरत मलिकशाह दर्गा या ठिकाणी चादरही चढवली आणि गोपीनाथ मुंडे यांच्यासाठी प्रार्थना केली. माझे बाबा (गोपीनाथ मुंडे) आज आपल्यात नसले तरीही त्यांचे विचार आणि संस्कार आजही आपल्यात आहेत. असंही पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.तंबाखू आणि पुड्या खाणं बंद करा आणि खाऊन कुठेही थुंकू नका. त्याने कॅन्सर होतो. तंबाखू पुड्या खाऊन तुम्ही मंदिराजवळ थुंकता, कसं दिसतं ते? यापुढे तंबाखू-पुड्या खाऊ नका. तसेच चांगलं चांगलं खा. मास-मच्छी, व्हेजिटेरियन खा आणि निरोगी राहा." असा सल्लाही पंकजा मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला. गोपीनाथ गडावर मुंडे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर होतं. रक्तदान करताना पंकजा मुंडे यांनी हे वक्तव्य केलं आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर या दिवशी दरवर्षी कार्यकर्ते मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर जमतात. या सर्वांनी यावेळी आपआपल्या गावात आपल्या आवडीप्रमाणे जयंती साजरी करावी.

### आवडीप्रमाणे जयंती साजरी करावी

» तसेच चांगलं चांगलं खा. मास-मच्छी, व्हेजिटेरियन खा आणि निरोगी राहा." असा सल्लाही पंकजा मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला. गोपीनाथ गडावर मुंडे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर होतं. रक्तदान करताना पंकजा मुंडे यांनी हे वक्तव्य केलं आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर या दिवशी दरवर्षी कार्यकर्ते मोठ्या संख्येने गोपीनाथ गडावर जमतात. या सर्वांनी यावेळी आपआपल्या गावात आपल्या आवडीप्रमाणे जयंती साजरी करावी.

# मंत्रिपदाचा कागद फाडून टाकेन

## अधिवेशनानंतर सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधिमंडळाच्या मागील अधिवेशनानंतर राज्य सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं बोललं जात होतं. मात्र मंत्रीमंडळ विस्तार झाला नाही. त्यामुळे सध्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रीमंडळ विस्तार होईल, असा दावा राजकीय वर्तुळातून केला जात आहे. याबाबत विचारलं असता प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रीपदाच्या शपथीचा कागद फाडून टाकेन, असं मोठं विधान बच्चू कडू यांनी केलं आहे.**

हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं तुम्हाला वाटतं का? असं विचारलं असता बच्चू कडू म्हणाले, "मी मंत्रिपदाचा दावाच नाकारला आहे. त्यामुळे हा प्रश्न तुम्ही भरत गोगावलेंना किंवा संजय शिरसाटांना विचारला पाहिजे. मी आता दावाच सोडला आहे तर मंत्रीमंडळ विस्ताराबाबत मला कशाला विचारता? मंत्रीपद हा विषय मी माझ्या डोक्यातून कधीच काढून टाकला आहे." बच्चू कडूंना कसल्याही मंत्रिपदाची गरजही नाही. 'हम अकेलेही काफी है, सब संभालने के लिए.'आता मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रिपदाच्या शपथपत्राचा कागद फाडून टाकेन आणि चार तुकडे करेन," असं थेट वक्तव्य बच्चू कडू यांनी केलं आहे. दरम्यान, बच्चू कडूंनी विधानसभेत वंचित घटकांच्या बाजूने भूमिका मांडताना सत्ताधाऱ्यांकडून नागरिकांमध्ये भेदभाव केला जात असल्याचा आरोप केला. यावेळी चालकांना कामगार दर्जा देण्याची मागणी त्यांनी केली. "सगळ्या वाहनांच्या चालकांना कामगार दर्जा देणं गरजेचं आहे. गावागावांमधल्या भूमीहीन मजुरांसाठी योजना आखायला हव्यात. शेतकऱ्यांप्रमाणेच या भूमीहीन मजुरांसाठीही योजना करायला हव्यात. देशभरात ११ हजार शेतमजुरांच्या आत्महत्या झाल्या आहेत. तो मजूर आहे म्हणजे कामगार नाहीये का? तुम्ही यावर कधी विचार केला आहे का? आपण यावर विचार करणं फार गरजेचं आहे", असं बच्चू कडू म्हणाले.



### मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही

» महाराष्ट्र विधिमंडळाच्या मागील अधिवेशनानंतर राज्य सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं बोललं जात होतं. मात्र मंत्रीमंडळ विस्तार झाला नाही. त्यामुळे सध्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रीमंडळ विस्तार होईल, असा दावा राजकीय वर्तुळातून केला जात आहे. याबाबत विचारलं असता प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रीपदाच्या शपथीचा कागद फाडून टाकेन, असं मोठं विधान बच्चू कडू यांनी केलं आहे.

# सालियान मृत्यूप्रकरणी SIT चौकशीचा आदेश

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

दिशा सालियन मृत्यूप्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक अर्थात एसआयटीद्वारे चौकशी करण्याचा आदेश दिला आहे. दिशा सालियान मृत्यू प्रकरणात ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केली. यानंतर सरकारने याबाबत एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यावर ठाकरे गटासह सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडून प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. दरम्यान, ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही यावर प्रतिक्रिया दिली. दिशा सालियान यांच्या मृत्यूप्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी करायची असेल तर जरूर करा. पण न्यायमूर्ती लोया आणि अनिक्षा जयसिंगानी, अमृता फडणवीस याप्रकरणातही एसआयटी गठीत करावी, अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली. त्यांनी 'एक्स'वर (पूर्वीचं ट्विटर) पोस्ट लिहून ही मागणी केली. संबंधित पोस्टमध्ये सुषमा अंधारे म्हणाल्या, "सीबीआयने दिशा सालियान प्रकरणात 'अपघाती मृत्यू' झाल्याचा निर्वाळा दिल्यानंतर ही एसआयटी नेमायची असेल तर नक्की नेमा. कर नाही त्याला डर कसली. पण सोबतच एक एसआयटी न्यायमूर्ती लोया आणि अनिक्षा जयसिंगानी, अमृता फडणवीस यांच्या प्रकरणातही नेमली जावी, एवढी माफक अपेक्षा आहे." दिशा सालियन मृत्यूप्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक अर्थात एसआयटीद्वारे चौकशी करण्याचा आदेश दिला आहे. दिशा सालियान मृत्यू प्रकरणात ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केली. यानंतर सरकारने याबाबत एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. यावर ठाकरे गटासह सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडून प्रतिक्रिया दिल्या जात आहेत.

# बंगालही पाकिस्तानला मिळाला असता!

## तृणमूलच्या खासदारावर अमित शाह संतापले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी वंग-भंग आंदोलन छेडल्यामुळेच पश्चिम बंगाल भारताला मिळाला, काँग्रेस त्यात पडले असते तर बंगालचा भारतातील उर्वरित भागही तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानात गेला असता”, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले आहे. लोकसभेत जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ ची चर्चा सुरू असताना तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ खासदार प्रा. सौगत रॉय यांनी सरकारवर टीका केली. यावेळी त्यांनी श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा विषय काढून ते कधीच स्वातंत्र्यासाठी तुरुंगात गेले नसल्याचे म्हटले. तसेच एकही हिंदुत्ववादी नेता तुरुंगात गेला नाही, असेही सौगत रॉय म्हणाले. यावेळी संतप्त झालेल्या अमित शाह यांनी त्यांचे विधान खोडून काढत थोडक्यात इतिहासाची मांडणी केली.**



विधेयकाची चर्चा सुरू असताना सौगत रॉय म्हणाले की, जम्मू आण काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्याचा निर्णय आम्हाला मान्य नाही. पण आता सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केल्यामुळे आमचा नाईलाज आहे. काल सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर भाजपाच्या नेत्यांनी मोठमोठी विधानं केली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, काश्मीरमध्ये आता नवा सूर्योदय होईल. पण वास्तव परिस्थिती पाहिली पाहीजे. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला म्हणाले की, आमची लढाई आता सुरू झाली. त्यांनी तक्रार केली की, त्यांना नजरकैदेत ठेवले गेले होते. मेहबुबा मुफ्तीदेखील नजरकैदेत होत्या. तुम्ही एका बाजूला निवडणुका घ्या म्हणतात आणि दुसऱ्या बाजूला स्थानिक नेत्यांना नजरकैदेत ठेवतात, असा आरोप त्यांनी केला. “सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत जम्मू आणि काश्मीरमध्ये आनंदाचे वातावरण नाही. काश्मीरमधील राजकीय पक्ष या निर्णयाला पाठिंबा देत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला पाठिंबा देण्यासाठी काश्मीरमध्ये एखादा मोर्चा निघाला का? अधीर रंजन चौधरी यांनी सांगितल्याप्रमाणे जर भाजपा सरकारमध्ये एवढी ताकद आहे तर त्यांनी चीनच्या ताब्यातून आपला अक्साई चीन हा प्रदेश मिळवून दाखवावा. काराकुरम महामार्ग काश्मीरमधून जातो, तो ताब्यात घेऊन दाखवा”, असे आव्हान सौगत रॉय यांनी दिले. “तुम्ही (भाजपा) म्हणता पंडीत नेहरूंमुळे काश्मीर पाकिस्तानच्या ताब्यात गेला. अमित शाह म्हणतात आम्ही श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या रस्त्यावर चालून हा भाग परत घेऊ. पण केव्हा घेणार? निवडणुका कधी लावणार? असा प्रश्न आहे.

### ज्यांनी भारताचे तुकडे केले

ज्यांनी भारताचे तुकडे केले, ते मोहम्मद अली जीना कोणत्या पक्षाचे होते. शामाप्रसाद मुखर्जी यांनी वंग-भंग आंदोलन केले नसते, तर पश्चिम बंगाल आज भारताचा भाग राहिला नसता. काँग्रेसच्या रचनेप्रमाणे तर पश्चिम बंगाल पूर्व पाकिस्तानाला मिळाला असता. शामाप्रसाद मुखर्जी यांनी वंग-भंग आंदोलन उभे केल्यामुळे उरलेला बंगाल भारताचा हिस्सा आहे. मी इतक्या विकृत दृष्टीने इतिहासाचे आकलन केलेले पाहिले नाही. दुसरे वंग-भंग आंदोलन केवळ शामाप्रसाद मुखर्जी यांच्यामुळे झाले आहे”, असे प्रत्युत्तर अमित शाह यांनी दिले.

श्यामाप्रसाग मुखर्जी बंगाली असल्यामुळे आम्ही त्यांचा आदर करतो. पण हेदेखील सत्य आहे की, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात श्यामाप्रसाद एकदाही तुरुंगात गेले नव्हते. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी मुस्लीम नेत्यासह युती करून एक मंत्रिमंडळ चालविले होते. त्यांचे एक प्रसिद्ध वाक्य होतं, ‘एक विधान, एक निशाण, एक प्रधान’. पण जो स्वातंत्र्यचळवळीत तुरुंगात गेला, त्यालाच मी पूर्ण नमन करतो, श्यामाप्रसाद यांना अर्धेच नमन करतो. त्यांच्याप्रमाणेच इतर एकही हिंदुत्ववादी नेता स्वातंत्र्यचळवळीत तुरुंगात गेला नाही.” तसेच राम मंदिर, अनुच्छेद ३७० हटविणे आणि समान नागरी कायदा आणणे, भाजपाचे ध्येय असल्याचे अमित शाह सांगतात. पहिले दोन ध्येय तर पूर्ण झाले. समान नागरी कायदा हा सांप्रदायिक दुही निर्माण करणारा आहे. आम्ही त्याला विरोध करत राहू, असे सौगत रॉय पुढे म्हणाले. अमित शाह यांनी सौगत रॉय यांच्या विधानावर जोरदार नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, “समान नागरी कायद्याती तरतूद भारतीय संविधानातच करण्यात आली आहे. तृणमूल काँग्रेसचे पूजनीय जवाहरलाल नेहरू यांनीची समान नागरी कायद्याची तरतूद मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करून ठेवली आहे. भविष्य काळात विधीमंडळ आणि संसद कोणत्या दिशेने चालले पाहीजे, यासाठी हे मार्गदर्शक तत्वे आखून दिलेली आहेत.

# जो बायडेन भारतात येणार नाहीत!

## क्वाड देशांची बैठकदेखील वर्षाच्या अखेरीस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांना २६ जानेवारी रोजी भारतात साजरा केला जाणाऱ्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केलं होतं. परंतु, बायडेन या कार्यक्रमाला येणार नाहीत, अशी बातमी समोर आली आहे. भारत पुढच्या वर्षी क्वाड देशांच्या शिखर परिषदेचंही आयोजन करणार आहे.**



ही बैठक जानेवारी महिन्यात होणार होती जी आता पुढे ढकलण्यात आली आहे. क्वाड बैठक प्रजासत्ताक दिनाच्या आसपासच आयोजित केली जाणार होती. त्यामुळे जो बायडेन हे प्रजासत्ताक दिन आणि क्वाड बैठक अशा दोन गोष्टींसाठी सलग काही दिवस भारतात येणं अपेक्षित होतं. परंतु, आता अशी माहिती मिळाली आहे की, बायडेन प्रजासत्ताक दिन सोहळ्याला येऊ शकणार नाहीत. तसेच काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला आहे की, क्वाड देशांची बैठकदेखील पुढच्या वर्षीच्या अखेरीस आयोजित केली जाऊ शकते. पुढच्या वर्षी भारतात होणारी क्वाड देशांची बैठक वर्षाच्या अखेरीस आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे. भारत सरकार आता सुधारित तारखांवर काम करत आहे. क्वाड देशांच्या प्रतिनिधींशी बोलून याबाबतचं वेळापत्रक ठरवलं जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यावर्षी मे महिन्यात जपानच्या हिरोशिमा येथे आयोजित जी-७ शिखर परिषदेत सहभागी झाले होते. त्यावेळी मोदी यांनी घोषणा केली होती की, क्वाड देशांच्या पुढच्या बैठकीचं आयोजन भारतात केलं जाईल. भारत, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि जपान हे क्वाडचे सदस्य देश आहेत. ‘क्वॉड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग’ (क्वाड) ही अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार देशांमधील धोरणात्मक युती आहे. या युतीची स्थापना २००७ साली झाली होती. आशिया-पॅसिफिक प्रदेशात म्हणजेच हिंद महासागर आणि प्रशांत महासागरादरम्यान येणाऱ्या सागरी क्षेत्रावरील चीनच्या वाढत्या प्रभावाला लगाम घालणं हे क्वाडच्या निर्मितीचं मुख्य अघोषित उद्दिष्ट आहे.

# मी मरण पत्करेन शिवराज सिंह चौहान यांचं वक्तव्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बहुमत मिळवलं आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली लढवलेल्या या निवडणुकीत भाजपाने २३० पैकी १६३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. दरम्यान, भाजपाचे केंद्रीय नेते मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी कोणाला देणार? याबाबत वेगवेगळे तर्क वितर्क लावले जात होते.

अखेर सोमवारी भाजपाने मुख्यमंत्री पदाबाबत मोठी घोषणा केली. उज्जैन दक्षिण मतदारसंघाचे आमदार मोहन यादव यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती केली आहे. भाजपाच्या या निर्णयामुळे शिवराजसिंह चौहान यांच्यासह समर्थकांमध्ये नाराजी असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, शिवराज सिंह चौहान यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी चौहान यांना विचारण्यात आलं की, निवडणूक जिंकल्यानंतर तुम्ही दिल्लीला न जाण्याबाबतचं वक्तव्य का केलं होतं? यावर माजी मुख्यमंत्री चौहान म्हणाले, मी पक्ष नेतृत्वकडे काहीतरी मागण्यापेक्षा मरण पत्करेन. माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या नेतृत्वात भाजपा सरकार आपली अपूर्ण राहिलेली कामं पूर्ण करेल.

मध्य प्रदेशचा विकास करेल. मी नेहमीच मोहन यादव यांना मदत करत राहीन. मी आज खूप समाधानी आहे. २००३ मध्ये उमा भारती यांच्या नेतृत्वात आपण बहुमतातलं सरकार स्थापन केलं होतं. पुढच्या काळात मी त्याच सरकारचं नेतृत्व केलं.

## 'पंचक' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज

अभिनेत्री माधुरी दीक्षित नेने (MADHURI DIXIT) आणि डॉ. श्रीराम नेने (SHRIRAM NENE) यांच्या पंचक (PANCHAK) या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. या चित्रपटाचा टीझर काही दिवसांपूर्वी रिलीज झाला होता. या टीझरला नेटकऱ्यांनी पसंती मिळाली होती. त्यानंतर या चित्रपटाच्या ट्रेलरची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत होते. आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. पंचक या चित्रपटाच्या ट्रेलरच्या सुरुवातीला काही कलाकार धावताना दिसत आहेत. त्यानंतर एका कुटुंबातील व्यक्तीचे निधन होते. त्या व्यक्तीच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबाला पंचक लागते. ट्रेलरमध्ये अभिनेते विद्याधर जोशी हे पंचक लागणे म्हणजे काय असते? याचा अर्थ सांगताना दिसत आहेत. ते म्हणतात, "पंचक लागलं म्हणजे मृत्यूच्या घटकेपासून एका वर्षाच्या आत मृत व्यक्तिच्या कुटुंबातील किंवा जवळचे पाच मृत्यू संभवतात." हे ऐकल्यानंतर कुटुंबातील सर्वच व्यक्ती घाबरतात. पंचक या चित्रपटात अभिनेता आदिनाथ कोठारे, दिलीप प्रभावळकर, भारती आचरेकर,आनंद इंगळे, तेजश्री प्रधान, सतीश आळेकर, नंदिता धुरी सागर शोध, संपदा कुलकर्णी ,आशिष कुलकर्णी, दीप्ती देवी, विद्याधर जोशी, गणेश मयेकर आणि आरती वडगबाळकर या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. माधुरी दीक्षित आणि श्रीराम नेने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. माधुरी दीक्षितनं नुकताच पंचक या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर शेअर केला आहे. या ट्रेलरला तिनं कॅप्शन दिलं, "सगळेच विचारतायत 'आता कोणाचा नंबर?'होऊ दे चर्चा, घेऊन आलोय 'पंचक' चा ट्रेलर !! थिएटर्समध्ये लागणार हास्याचा पंचक." 5 जानेवारी 2024 रोजी पंचक हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. म्हणजेच प्रेक्षकांच्या वर्षाची सुरुवात ही मनोरंजनानं होणार आहे. माधुरी दीक्षित आणि श्रीराम नेने यांनी '15 ऑगस्ट' या मराठी चित्रपटाची निर्मिती केली होती. आता त्यांचा पंचत हा चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे.

## ही भूमिका माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेरची

अभिनेता बॉबी देओल (BOBBY DEOL) हा सध्या त्याच्या ॲनिमल (ANIMAL) या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ॲनिमल चित्रपटामध्ये बॉबीनं साकारलेल्या अबरार या भूमिकेचं अनेकजण कौतुक करत आहेत. ॲनिमल या चित्रपटात अबरारला बोलता येत नसते. पण या चित्रपटात एकही वाक्य न बोलता केवळ अभिनयाच्या जोरावर बॉबीनं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आता ॲनिमल या चित्रपटानंतर बॉबीच्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये बॉबीनं त्याच्या आगामी चित्रपटाची माहिती दिली आहे. साऊथ स्टार सुर्याच्या 'कांगुवा' (KANGUVA) या चित्रपटात बॉबी काम करणार आहे. एका मुलाखतीमध्ये बॉबीनं या चित्रपटाबद्दल सांगितलं, "होय, मी सुर्यासोबत कांगुवा या चित्रपटात काम करत आहे. या चित्रपटाची टीम अप्रतिम आहे, शिवा हा स्विटहार्ट आहे आणि सुर्या हा एक अप्रतिम अभिनेता आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत काम करताना खरा आनंद होतो." 'कांगुवा' चित्रपटामधील भूमिकेबाबत बॉबी म्हणाला, "ही भूमिका नक्कीच माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेरची आहे, मला ही भाषाही येत नाही, त्यामुळे ती पुन्हा माझ्या झोनच्या बाहेरचे काम करत आहे. मी एक-दोन महिन्यात तमिळ शिकू शकत नाही, पण मी त्यावर नक्कीच काम करेन." आता कांगुवा या चित्रपटामधील बॉबीचा अभिनय पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## रश्मिका पोहोचली काश्मीरला

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR), रश्मिका मंदाना (RASHMIKA MANDANNA) आणि बॉबी देओल (BOBBY DEOL) अभिनीत 'ॲनिमल' (ANIMAL) हा सिनेमा काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. एकीकडे हा सिनेमा बॉक्स ऑफिस गाजवत असताना रश्मिका मंदाना काश्मीरला (KASHMIR) पोहोचली आहे. दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीसह बॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाचा जलवा दाखवणारी अभिनेत्री रश्मिका मंदाना सोशल मीडियावर नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने ॲक्टिव्ह असते. अभिनेत्रीचा 'ॲनिमल' हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. दरम्यान तिने सोशल मीडियावर (SOCIAL MEDIA) एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये रश्मिका काश्मीरमध्ये (KASHMIR) मजा-मस्ती करताना दिसत आहे. रश्मिकाने काश्मिरमध्ये मजा-मस्ती करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये अभिनेत्रीचा क्यूट अंदाज पाहायला मिळत आहे. तिचा काश्मिरमधील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. रश्मिकाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर एकीकडे तिचं कौतुक होत आहे. तर दुसरीकडे काहींनी मात्र तिला ट्रोल केलं आहे. रश्मिकाची पोज नेटकऱ्यांना न आवडल्याने त्यांनी तिला ट्रोल करायला सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे नॅशनल क्रश, क्यूटी, किती गोड, अशा कमेंट्स चाहत्यांनी केल्या आहेत. रश्मिका मंदाना ही मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य सिनेमांसह बॉलिवूडदेखील तिने गाजवलं आहे.



## उर्फीची फॅशन विषय संपला!

मनोरंजन विश्वामध्ये नेहमीच हटके गोष्टी करुन प्रसिद्धीच्या झोतात राहणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. मात्र याला काही सेलिब्रेटी अपवाद आहेत. त्यात उर्फीची गोष्टच वेगळी आहे. तिनं काहीही केलं तरी ती चर्चेत येते. देशातील फॅशन क्षेत्रातील निराळी सेलिब्रेटी म्हणून तिनं तिची ओळख निर्माण केली आहे. उर्फीला जी फॅशन योग्य वाटते ते ती बिनधास्तपणे करते. आणि आपण केलेली फॅशन नेटकऱ्यांनी पाहावी यासाठी ते व्हिडिओ किंवा फोटो सोशल मीडियावर पोस्टही करते. आता कित्येकांनी तिच्यावर सडकून टीकाही केली आहे. तिला खूप काही सुनावलेही आहे. पण ऐकेल ती उर्फी कसली, आपल्याला जे वाटतं ते केल्याशिवाय शांत बसायचं नाही असा उर्फीचा स्वभाव आहे. फॅशन विश्वात उर्फीचं नाव फारच वेगळ्या प्रकारे घेतले जाते. उर्फीनं तिच्या घरातील वेगवेगळ्या वस्तूंची फॅशन करुन नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यावर तिला आलेल्या कमेंटसही भन्नाट आहेत. कधी घरातील ग्लास, तर कधी चमचा तर कधी धागे दोरे यांच्या मदतीनं तिनं केलेला ड्रेस हा जोरदार चर्चेचा आणि कमेंटचा विषय ठरला आहे. आता उर्फीचा एक वेगळाच व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तिनं शाळकरी मुलीचा ड्रेस परिधान केल्याचे दिसून आले आहे. मात्र तिनं तिच्या स्टाईलनं तो परिधान केला आहे. त्यामुळे ती चर्चेत आली आहे. त्यावर नेटकऱ्यांनी नेहमीप्रमाणे तिची कानउघाडणी केली आहे. तिच्यावर टीकाही केली आहे. पण काहींनी मात्र तू देशातील एक क्रिएटिव्ह फॅशन सेन्स असलेली सेलिब्रेटी आहे असेही म्हटले आहे. यापूर्वी वेगवेगळ्या फॅशन सेन्समुळे उर्फी वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. त्यामुळे तिला काही राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून देखील विरोधाला सामोरं जावं लागलं होतं. पण त्या महिला नेत्यांना उर्फीनं तिच्या अंदाजात उत्तर देऊन गप्पगार केल्याचे दिसून आले होते.

## पूजा सावंत लवकरच लग्नबंधनात अडकणार

मराठीमोळी 'कलरफुल' अभिनेत्री पूजा सावंत (POOJA SAWANT) लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. पूजा कधी आणि कोणासोबत लग्न करणार याची चाहत्यांना उत्सुकता होती. अखेर काही दिवसांपूर्वी तिने जोडीदारासोबतचा फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत पूजाने उखाणे घेण्यास सज्ज असल्याचं सांगितलं आहे. पूजा सावंत ही मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री असून सिद्धेश चव्हाणसोबत (SIDDHESH CHAVAN) लवकरच ती विवाहबंधनात अडकणार आहे. आयुष्यातल्या 'मुसाफिर'बद्दल एबीपी माझाशी बोलताना पूजा सावंत (POOJA SAWANT ON FIANCE) म्हणाली,"माझ्या रिअल लाईफ हिरोचं नाव सिद्धेश चव्हाण आहे. आता आयुष्याचा नवा अध्याय सुरू होणार आहे. सिद्धेश आणि माझं अरेंज मॅरेज आहे. एकमेकांना पहिल्यांदा भेटल्यापासून लग्न ठरवण्यापर्यंत आम्ही खूप वेळ घेतला. त्यामुळे ते अरेंज कम लव्ह मॅरेज असेल".

लग्नाच्या मुहूर्ताबद्दल बोलताना (POOJA SAWANT ON MARRIAGE) पूजा सावंत म्हणाली,"चव्हाण आणि सावंत हे दोन्ही कुटुंबिय मिळून लग्नाबाबत निर्णय घेतील. सध्या दोन्ही कुटुंबियांमध्ये लग्नाबाबत बोलणी सुरू आहे. सिद्धेशला त्याच्या कामातून आणि मला माझ्या प्रोजेक्टमधून वेळ मिळेल त्यावेळी लगेचच आम्ही लग्न करू. उखाणे घेण्यास आता मी सज्ज आहे". पूजा सावंत म्हणते,"आमचं लव्हमॅरेजच आहे. पहिल्यांदा भेटल्यापासून ते हाच आपला जोडीदार म्हणून योग्य आहे हे ठरवण्याच्या प्रोसेसदरम्यान आम्ही अनेकदा एकमेकांना भेटत होतो. त्यावेळी एकमेकांचे स्वभाव कळले. वैयक्तिक आयुष्यासंबंधित गोष्टींचं गुपित ठेवायला मला आवडतं. त्यामुळे गेलं दीड वर्ष मी हे नातं सर्वांपासून लपवून ठेवलं". पूजा पुढे म्हणते,"सिद्धेश मला क्लिक झाला असा एक क्षण सांगता येणार नाही..असे अनेक क्षण आले. पहिल्या भेटीतच मला सिद्धेश आवडला होता. स्थळ आल्यानंतर पहिला फोन मी त्याला केला होता. पुढे हळूहळू सिद्धेशचा स्वभाव कळला. तो प्रचंड सपोर्टिव्ह आहे. तसेच कायमच माझ्या पाठिशी आहे. सिद्धेशसोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाला मला वाटत होतं की हाच माझ्यासाठी योग्य जोडीदार आहे".



# सूर्यकुमार-रिंकू सिंहचे अर्धशतक व्यर्थ!

## » आफ्रिकेचा भारतावर पाच गडी राखून विजय

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पावसामुळे प्रभावित झालेल्या सामन्यात नशिबाने दक्षिण आफ्रिकेची साथ दिली आणि टीम इंडियाचा पाच गडी राखून पराभव झाला. या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना १९.३ षटकात १८० धावा केल्या होत्या. पावसाला सुरुवात झाली आणि डकवर्थ लुईसच्या नियमानुसार दक्षिण आफ्रिकेला १५ षटकात १५२ धावांचे लक्ष्य मिळाले.**





पाऊस पडल्याने मैदान आधीच ओलसर झाले होते. त्यामुळे गोलंदाजांना कुठलीही मदत मिळाली नाही. चेंडू सतत ओला होत होता. ना स्विंग ना स्पिन होता तरीही, टीम इंडियाने चांगली लढत दिली. भारताची ही झुंज अखेर अपयशी ठरली आणि पावसाने टीम इंडियाचा पराभव केला. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना मंगळवारी (१२ डिसेंबर) खेळला गेला. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करामने गबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्कवर नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. १५ षटकांत १५२ धावांचे लक्ष्य मिळाले. त्यांनी १३.५ षटकात १५४ धावा करत सामना जिंकला. यासह त्याने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली. तिसरा आणि अंतिम सामना १४ डिसेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे खेळवला जाईल. १४व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर अँडिले फेहलुकवायोने रवींद्र जडेजाला षटकार ठोकला आणि सामना संपवला. आफ्रिकन संघाने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली. तिसरा आणि अंतिम सामना जोहान्सबर्ग येथे गुरुवारी होणार आहे. टीम इंडियाने तो सामना जिंकला तर मालिका बरोबरीत येईल. याबरोबरच दक्षिण आफ्रिकेची नजर मालिका २-०ने जिंकण्यावर असेल. तत्पूर्वी, भारताचा डाव संपणार होता तेव्हा पाऊस आला आणि पंचांनी खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. खेळ थांबला तेव्हा भारताने १९.३ षटकांत सात गड्यांच्या मोबदल्यात १८० धावा केल्या होत्या. रिंकू सिंग ३९ चेंडूत ६८ धावा केल्या आणि तो नाबाद राहिला. मोहम्मद सिराजला एकही चेंडू खेळायला मिळाला नाही कारण, तेव्हाच पावसाला सुरुवात झाली होती. खाते न उघडता नाबाद आहे. भारताकडून कर्णधार सूर्यकुमार यादवने ५६ धावांची खेळी केली. तिलक वर्माने २९ तर रवींद्र जडेजाने १९ धावा केल्या आहेत. यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल आणि अर्शदीप सिंग यांना खाते उघडता आले नाही. जितेश शर्माने केवळ एक धाव काढली. दक्षिण आफ्रिकेकडून जेराल्ड कोएत्झीने तीन विकेट्स घेतल्या. मार्को जॅनसेन, लिझाद विल्यम्स, तबरेझ शम्सी आणि एडन मार्करन यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश मिळाले. भारताच्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याची सुरुवात टी-२० मालिकेने होत आहे. डरबनमध्ये खेळलेला पहिला टी-२० पावसामुळे रद्द झाला, त्यात नाणेफेकही होऊ शकली नाही. टी-२० मालिकेपाठोपाठ वन डे मालिका होणार असून कसोटी मालिकेने या दौऱ्याचा शेवट होणार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान आणि उसळत्या खेळपट्ट्यांवर चांगली कामगिरी करण्याचे आव्हान युवा भारतीय संघासमोर असेल.

### षटकार मारून सामना संपवला

» १४व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर अँडिले फेहलुकवायोने रवींद्र जडेजाला षटकार ठोकला आणि सामना संपवला. आफ्रिकन संघाने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली. तिसरा आणि अंतिम सामना जोहान्सबर्ग येथे गुरुवारी होणार आहे. टीम इंडियाने तो सामना जिंकला तर मालिका बरोबरीत येईल. याबरोबरच दक्षिण आफ्रिकेची नजर मालिका २-०ने जिंकण्यावर असेल. ही झुंज अखेर अपयशी ठरली आणि पावसाने टीम इंडियाचा पराभव केला.

# रक्ताच्या उलट्या केल्या, कॅन्सरला हरवलं!

## » विश्वचषक जिंकून दिला, हॅप्पी बर्थडे सिक्सर किंग

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंह (YUVRAJ SINGH) आज 42 वा वाढदिवस साजरा करत आहे. युवराज सिंहचा (YUVRAJ SINGH BIRTHDAY ) जन्म 12 डिसेंबर 1981 रोजी झाला. युवराजनं आपल्या कारकिर्दीत अनेक मोठ्या विक्रमाला गवसणी घातलीय. जगातील सर्वात स्फोटक फलंदाजांमध्ये युवराज सिंहची गणना केली जाते. 2011 आणि 2007 च्या विश्वचषक (WORLD CUP) विजयात युवराजचा वाटा मोठा होता. 2011 विश्वचषकादरम्यान कॅन्सरसोबत लढला, रक्ताच्या उलट्याही केल्या, पण त्याने हार मानली नाही.**



युवराज सिंहच्या नेतृत्वाखाली भारतानं 2000 मध्ये प्रथमच अंडर-19 विश्वचषक जिंकला होता. या संपूर्ण स्पर्धेत युवराजची कामगिरी उत्कृष्ट होती. या स्पर्धेत उत्तम कामगिरी केल्याबद्दल त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कारही देण्यात आला. त्यानंतर भारतानं 2007 मध्ये टी-20 विश्वचषक आणि 2011 मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता. युवराज सिंह या दोन्ही विश्वचषकविजेत्या संघाचा सदस्य होता. या दोन्ही स्पर्धेत त्याना मालिकावीर पुरस्कार पटकावला. 2011 विश्वचषकादरम्यान तो मैदानावर तर लढतच होता, पण त्याचवेळी त्याने कॅन्सरशीही लढा दिला. युवराजच्या लढाऊ वृत्तीला आजही क्रिकेट चाहते सलाम ठोकतात. युवराजला भारताचा सर्वात मोठा मॅचविनर खेळाडू म्हटले जातेय. भारतानं 2007 मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वात पहिला टी-20 विश्वचषक जिंकला होता. भारताच्या विजयात स्टार फलंदाज युवराज सिंहनं महत्वाची भूमिका बजावली. या संपूर्ण स्पर्धेत युवराज सिंहनं भारतासाठी सातत्यानं धावा केल्या. या स्पर्धेत युवराज सिंहनं इंग्लंडविरुद्ध सामन्यात अवघ्या 12 चेंडूत अर्धशतक ठोकलं होतं. याच सामन्यात युवराजनं सहा चेंडूत सहा षटकार ठोकले होते. युवराजनंतर नेदरलँड्सचा फलंदाज स्टीफन मायबर्गनं 2014 च्या विश्वचषकात 17 चेंडूत अर्धशतकीय खेळी केली. 2011च्या एकदिवसीय विश्वचषकात युवराज सिंहनं चमकदार कामगिरी केली. त्यानं 2011 मध्ये भारताला विश्वचषक जिंकून दिला होता. या विश्वचषकात त्यानं 362 धावा केल्या आणि 15 विकेट घेतल्या. त्याच्या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कारही देण्यात आला होता. 2011 विश्वचषकावेळी युवराजची अवस्था फारच वाइट होती. कॅन्सर झाल्यामुळे मानसिक आघात होताच, पण त्यात खेळत असताना रक्ताच्या उलट्या होत होत्या. तरिही त्याने फलंदाजी केली. तो मैदानावर उभा राहिला आणि त्याने आपला सर्वोत्तम खेळ दाखवत भारताला विजेतेपद मिळवून दिले. संघासाठी युवराजने कॅन्सरसारखा आजार लपवून विश्वचषकात भाग घेतला होता.

### युवराज सिंहची कारकिर्द

» युवराज सिंहनं भारतासाठी 40 कसोटी, 304 एकदिवसीय आणि 58 टी-20 सामन्यात भारताचं प्रतिनिधित्व केलंय. कसोटीत युवराज सिंहनं 1 हजार 900 धावा केल्या आहेत. ज्यात त्यानं तीन शतकं आणि 11 अर्धशतक झळकावली आहेत. तर, एकदिवसीय क्रिकेटमध्ये 14 शतक आणि 52 अर्धशतकांच्या जोरावर त्यानं 8 हजार 701 धावा (सर्वोत्तम धावसंख्या- 169) केल्या आहेत. तर, टी-20 क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर 1 हजार 177 धावांची (सर्वोत्तम धावसंख्या-150) नोंद आहे. ज्यात 8 अर्धशतकांचा समावेश आहे. युवराज सिंहनं आयपीएलमध्ये 132 सामने खेळले आहेत. ज्यात त्यानं 2 हजार 750 धावा (सर्वोत्तम धावसंख्या-83) केल्या आहेत.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | WEDNESDAY, 13th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Sporting spirit increases confidence among students!

## Says Jyoti Parihar, Assistant Deputy Director of Education; Gayatri English School celebrates Annual sports day in fervor








Pimpri. Representative Sachin Tendulkar, a simple boy from an ordinary family who barely had interest in studies becomes India's greatest cricketer. He is honored with the Bharat Ratna Award for his outstanding achievements in sports. Not everyone becomes this successful in life. However, if we cultivate interest in any sport, we develop sporting spirit and this way students will gain more self-confidence. This motivates to succeed in life. Jyoti Parihar, Assistant Deputy Director of Education expressed this valuable thought and teachers and parents should keep certainly this in mind.

Swami Vivekananda Shikshan Prasarak Mandal (SVSPM) celebrated annual Sports Day at Gayatri English Medium School, Bhosari. Jyoti Parihar lighted 'kreeda jyot' i.e. a flame dedicated to sports and gave a green signal to sports competitions.

Under 19 Pro Kabaddi League gold medalist Sunil Landge, managing director Kavita Bhongale along with the teaching and non-teaching staff of sports department were present on this occasion. Gayatri School has organized the competitions at Rajarshi Sri Shahu Maharaj Kridangan in Shahunagar. The contestants have been grouped according to class, and the winners will be given a certificate and a medal.

> Annual Sports Day is organized every year in all branches of Swami Vivekananda Shikshan Prasarak Mandal. Students should be motivated to prove their skills in sports. Students also spontaneously participate in all competitions held to serve this purpose. A platform should be given to the talent of students and children from ordinary families should get an opportunity to play at district, state and national level. The school management strives for this aim.
>
> **-Kavita Bhongale,**
> Managing Director, SVSPM.